# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTI DISCIPLINARY STUDIES

MONTHLY DOUBLE-BLIND PEER REVIEWED REFERRED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL

www.irjms.in

E-mail : irjms2015@gmail.com irjms.in@gmail.com

Vol. V, Issue -V ISSN (Online) : 2454-8499 May - 2019

Impact Factor : 1.3599(GIF), 0.679 (IIFS)




INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

IRJMS


Executive Editor
Prof. Tanaji Jadhav

Chief Editor
Dr. Mahendra Avaghade

23

# International Research Journal of Multidisciplinary Studies


Chief Editor
Dr. Mahendra R. Avaghade

Executive Editor
Prof. Tanaji D. Jadhav

Published by
**IJRMS**
Sr. No. 397, Flat No. 7, 4 Sizan Society,
Bhugaon, Tal. Mulshi, Dist. Pune 412115

**Printed by**
**Anmol Graphics**
Flat No.3, Ojas Apartment
Sr.No.57/3B, NR, Morya Vihar, Kothrud, Pune 411038



Copyrights: Editors @2019
All Rights reserved



ISSN: 2454-8499 (Online)

Issue
Available at www.irjms.in

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

IRJMS

Vol. 5, Issue 5, May, 2019 | ISSN (Online): 2454-8499 | Impact Factor: 1.8167(GIF), 0.679(IIFS)

# महाराष्ट्रातील विचारवंतांचा राजकीय विकासाचा दृष्टिकोन

**प्रा. डॉ. राठोड भरत**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पुणे.

**प्रस्तावना :-**

सन 1812 मध्ये महाराष्ट्रातून पेशवाई संपुष्टात आली आणि ब्रिटीशांचा अंमल सुरु झाला. ईस्ट इंडिया कंपनी सरकारने व्यापाराबरोबर साम्राज्याचे, अधिकारशाहीचे व एकाधिकारशाहीचे बिजारोपण करायला सुरुवात केली आणि तेव्हापासून तर स्वातंत्र्यापर्यंत महाराष्ट्रात अनेक राजकीय स्थित्यंतरे घडून आलेत. अनेक राजकीय विचारवंत उदयाला आले. त्यांनी राजकीय विकासाचा व परिवर्तनाचा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेऊन कार्य केले. कुणाचा मार्ग सनदशीर होता तर कुणाचा जहाल तर कुणी मध्यस्थीची भुमिका घेऊन राजकारण करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटीशांवर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या दबाव टाकायला सुरुवात केली कु-राज्याकडून सु-राज्याकडे नेण्याचं बळ दिले, किमान भारतीयांना स्वतंत्र भारताचे स्वप्न दाखविले. राजकीय हक्क व अधिकार प्रस्थापित व्हावेत त्यासाठी विचार, लेखन, भाषण, प्रबोधन या साधनांचा आधार घेतला. महाराष्ट्राचा राजकारणांत एक चांगला, विधायक, राजकीय सिध्दांत उभा केला. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर ह्याच राजकीय सिध्दांताची व मुल्यांची गरज वर्तमानातील राज्यकर्त्यांना जेव्हा भासू लागली तेव्हा जाणवले महाराष्ट्रातील राजकीय विचारवंतांचा राजकीय विकासाचा दृष्टीकोन किती विधायक स्वरुपाचा होता.

**ध्येय आणि उद्दिष्टे :-**

1. महाराष्ट्रातील 19व्या शतकाच्या पुर्वार्धातील राजकीय विचारवंतांच्या राजकीय विकासाचा दृष्टीकोन अभ्यासणे.
2. महाराष्ट्रातील धार्मिक चालीरीती, परंपरा यांना झुगारून राजकीय विकासात कार्यरत असलेल्या महाराष्ट्रातील राजकीय विचारवंतांच्या कार्याचा शोध घेणे.
3. ब्रिटीश शासनाच्या आधारे शासकीय विकास साध्य करायचा किंवा स्वातंत्र्यप्राप्तीच्या अंतीम ध्येयानंतर राजकीय विकास साध्य करायचा याबाबत महाराष्ट्रातील राजकीय विचारवंतांच्या भुमिकेचा तुलनात्मक शोध घेणे..
4. सनदशीर मार्गाने राजकीय विकास साध्य करायचा कि क्रांतिच्या, अहिंसक मार्गाने राजकीय विकासाला प्राधान्य द्यायचे याबाबतच्या तत्कालीन परिस्थितीतील राजकीय विचारवंतांच्या मते मतांतराचा अभ्यास करणे.

5. महाराष्ट्रातील राजकीय विचारवंतांच्या राजकीय विचारातील राष्ट्रवादी भावनेचा शोध घेणे व अंतीम निष्कर्ष काढणे हे या संशोधन लेखाचे प्रमुख ध्येय आणि उद्दिष्ट आहे.

**गृहितके :-**

1. 18व्या शतकात महाराष्ट्र गुलामगिरीच्या, अज्ञानाच्या व दारिद्र्याच्या अंधारयुगात वावरत होता.
2. ब्रिटिश साम्राज्याच्या जोखडात महाराष्ट्रीयन जनता पिचून निघत होती.
3. पाश्चात्य शिक्षणामुळे आपण राजकीय गुलामगिरीत आहोत याची जाणीव विचारवंतांना झाली होती.
4. इंग्लंडच्या धर्तीवर आधारीत भारतात घटनात्मक शासन व प्रातिनिधीक शासन असावे अशी विचारवंतांची धारणा होती.
5. पत्रव्यवहाराने, अर्ज विनंतीने, सनदशीर मार्गाने अथवा विरोध करून राजकीय हक्क प्राप्त करता येतात.

**संशोधन पध्दती :-**

संशोधन प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी तसेच संशोधनाची ध्येय व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय संशोधन साधनांचा व पध्दतीचा आधार घेण्यात आला आहे. महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय सुधारकांच्या कार्याचा तुलनात्मक व विश्लेषणात्मक अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक पुरावे, साधने, लेख, घटना, प्रसंग यांचा आधार घेण्यात आला आहे. तसेच ग्रंथालयीन विश्वकोष, संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्रे, मासिके यातील संदर्भांचा, कागदपत्रे, दसतऐवज यांचा पुरावे म्हणून आधार घेण्यात आला आहे.

**माहितीचे विश्लेषण :-**

महाराष्ट्राच्या भूमीला सांस्कृतिक विद्वानांची भूमी, विचारवंतांची भूमी, समाजसुधारकांची व राजकीय विचारवंतांची भूमी म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राच्या मातीत असे राजकीय विचारवंत जन्माला आले ज्यांनी संपुर्ण भारताच्या राजकीय चळवळीला व क्रांतीला दिशा दिली, मार्गदर्शन केले. एवढेच नाही तर भारताला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यात अत्यंत मोलाची भूमिका अदा केली आहे. आज भारतामध्ये जे लोकशाही समाजवादी घटनात्मक शासन आहे त्या शासनाच्या प्रतिष्ठापणेमागे राजकीय सिध्दांताची वैचारिक मांडणी करणारे महाराष्ट्रातील राजकीय विचारवंत आहेत व महाराष्ट्रामध्ये बहुजनांचे दलितांचे, आदिवासींचे, मराठ्यांचे व स्थानिक स्वराज्य संस्थेत स्त्रियांचे राज्य प्रस्थापित करण्यापाठीमागची महत्वाची भूमिका व त्याग हा महाराष्ट्रातील राजकीय विचारवंतांचाच आहे.

**आलेख**

- डॉ.बाबासाहे ब आंबेडकर

- स्वा.सावरकर
- छ.शाहू महाराज
- म.शिंदे
- लो.टिळक
- वि.चिपळूणकर
- फिरोजशहा मेहता
- न्यायमूर्ती रानडे
- सार्वजनिक काका
- महात्मा फुले
- लोकहितवादी
- जगन्नाथ शंकरशेठ

**महाराष्ट्रातील विचारवंतांचा राजकीय विकासाचा दृष्टीकोन (आलेख)**

**1) जगन्नाथ शंकरशेठ -**

28 ऑगस्ट, 1852 रोजी जगन्नाथ शंकरशेठ यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील नवशिक्षित तरुणांनी आपल्या देशबांधवांच्या बाबतीत होत असलेला अन्याय दूर करण्याकरीता बॉम्बे असोसिएशन नावाची संस्था स्थापन केली. कार्यवाहपदी विनायक जगन्नाथ शंकरशेठ हे होते. ज्या काळात सर्वसामान्य जनतेला स्वत:च्या हक्कांची तितकीशी जाणीव नव्हती, त्या काळात सर्वसामान्यांना स्वत:च्या हक्कांची जाणीव करून देण्याचे काम या संस्थेने केले. जनतेचे अनेक जिव्हाळ्याचे प्रश्न मोठ्या चिकाटीने आणि खंबीरपणे सोडवले. एका अर्थाने महाराष्ट्रात स्वातंत्र्याचे बीजारोपण करणारी ही पहिली संस्था म्हणता येईल. म्हणून या सभेचा स्थापना दिवस भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनीच लिहावा लागेल. इंग्रजांकडून स्वातंत्र्य मिळवून ज्या लोकशाही राज्याचा आपण उपभोग घेत आहोत त्याचे बिजारोपण ह्या संस्थेत होते. याच संस्थेचे पुढे बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन मध्ये रुपांतर केले गेले.

**2) लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख -**

लोकहितवादी इतकाच अनुभव आणि इतिहासाचे व काळाचे ज्ञान फारच थोडक्यांना होते, असे प्रशस्तीपत्र टिळकांनी त्यांना दिले होते. समाजसुधारणेबरोबर राज्यसुधारण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. याबाबतचे त्यांचे विचार अगदी योग्य आहेत. त्यांचे मत होते - सर्व गरीबांनी व श्रीमंतांनी एकत्र येऊन ब्रिटीशांकडे अर्ज करावा की, हिंदुस्थानचे स्वतंत्र पार्लमेंट असावे, या लोकांत भट, गृहस्थ, शास्त्री, परभू, कुळंबी, मुसलमान इंग्रज असे जे शहाणे असतील ते नेमावे व त्यांनी राज्य चालवावे. अशाने राज्याची सुधारणा उत्तम होऊन लोकसत्ताक राज्यात मुळ काय आहे हे दृष्टोत्पत्तीस येईल. अर्थात

त्यासाठी लोकांमध्ये स्वार्थत्याग, दीर्घकालीन उद्योगाची चिकाटी, मुत्सद्देगिरी, धाडस, संघटित शक्ती असणे फार जरुरीचे आहे. अशाप्रकारे सर्व जाती आणि वर्ण व्यवस्थेतील लोकांना एकत्र आणण्याचा त्यांचा हा प्रयत्न खरोखरच क्रांतिकारक म्हणावा लागेल. गेल्या शतकात दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ति रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक इत्यादींनी महाराष्ट्रात जी वैचारिक क्रांति घडवून आणली तिचा पाया घालण्याचे महान कार्य लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख यांच्यासारख्या विचारवंतांनी केले.

**3) महात्मा ज्योतिबा फुले -**

महात्मा ज्योतिबा फुले हे बोलघेवडे समाजसुधारक नव्हते तर प्रत्यक्ष सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून जशी सामाजिक कार्याला चालना दिली तशीच राजकीय कार्याला देखील चालना दिली.

पुणे नगरपालिकेचे सदस्य म्हणून काम करतांना ज्योतिरावांनी वेताळ पेठेतील भाजीपाला विक्रेत्यांचा प्रश्न सोडविला. लॉर्ड लिटन यांच्या पुणे आगमनाप्रित्यर्थ सर्व शहर सुशोभित करण्याच्या नगरपरिषदेच्या प्रस्तावाला 32 पैकी 31 सदस्यांनी अनुमोदन दिले. एकट्या ज्योतिरावांनी या ठरावाला विरोध करण्याचे धैर्य दाखवले. टिळक व आगरकर यांच्या बर्वे प्रकरणात टिळक व आगरकरांना साथ दिली. त्यांचा पुण्यात जाहीर सत्कार केला. रायगडावर हिंदवी स्वराज्याची स्थापना करणा-या छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीची दुरावस्था झालेली होती. तिच्याकडे ब्रिटीश शासनाचे लक्ष वेधले.

सन 1882 साली इंग्रज सरकारने सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील शिक्षणविषयक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी हंटर कमिशन नेमले. 19 ऑक्टोबर 1882 रोजी ज्योतिरावांनी कमिशनपुढे साक्ष देतांना म्हटले, शाळांवरील देखरेख करणारी सरकारी यंत्रणा अपूर्ण आहे असे म्हटले व सरकारकडून अपेक्षा व्यक्त केल्या. त्यात शासनाने प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी, शेतक-यांकडून घेतल्या जाणा-या शेतसा-याचा अर्धा हिस्सा प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा, नगरपालिकेच्या हद्दीतील शाळा सरकारने चालवाव्या त्यासाठी कायदा करावा, त्या शाळांना भरपूर अनुदान द्यावे.

सन 1885 साली राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. राजकीयदृष्ट्या भारतातील सर्व नेत्यांना एकत्र आणण्यासाठी राष्ट्रीय सभेचा प्रयत्न होता. मुंबई येथे राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन पार पडले. ज्योतिरावांचा राष्ट्रीय सभेला विरोध होता. महार, मांग, शेतक-यांच्या प्रश्नांची जाण नसलेली राष्ट्रीय सभा ही राष्ट्रीय असूच शकत नाही असे त्यांचे मत होते. राष्ट्रीय सभा ही सर्वधर्मीयांची बनावी म्हणजे भारताला राजकीय भविष्य लाभेल असे त्यांचे ठाम मत होते.

Vol. 5, Issue 5, May, 2019 | ISSN (Online): 2454-8499 | Impact Factor: 1.8167(GIF), 0.679(IIFS)


4) **गणेश वासुदेव जोशी (सार्वजनिक काका) -**

राजकीय, त्याचबरोबर सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक अशा प्रकारच्या वेगवेगळ्या क्षेत्रात समाजाला जागरूक करण्याचे महत्वाचे कार्य सार्वजनिक काका यांनी इ.स.1870 मध्ये पुणे येथे सार्वजनिक सभेची स्थापना करून केले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील ही एक प्रभावी संस्था म्हणून नावारुपास आली. पुढे तिला एका राजकीय संस्थेचे स्वरूप प्राप्त झाले. ब्रिटिश सरकार आणि सर्वसामान्य जनता यांच्यामधील महत्वाचा दुवा म्हणजे सार्वजनिक सभा होय. भारतीय जनतेच्या मनातील इच्छा सरकारपुढे मांडण्याचे कार्य सार्वजनिक सभेनेच केले. जनतेच्या हक्काची ब्रिटिश सरकारला जाणीव करून दिली. इ.स. 1874 मध्ये ब्रिटिश पार्लमेंटमध्ये हिंदी जनतेलाही प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी सभेने ब्रिटिश सरकारकडे अर्ज केला. इ.स. 1876-77 मध्ये महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळाच्या काळात दुष्काळग्रस्त शेतक-यांना सहाय्य करण्याचे आणि त्यांची गा-हाणी सरकारपुढे मांडण्याचे कार्य सार्वजनिक काकांनी सार्वजनिक सभेच्या वतीने केले आणि याकामी पुणे सार्वजनिक सभेने यशस्वीपणे झुंज दिली. न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे, लोकमान्य टिळक, गोपाळकृष्ण गोखले यांच्यामुळे सभेला अधिक प्रगत स्वरुप प्राप्त झाले.

5) **न्या.महादेव गोविंद रानडे -**

महाराष्ट्रातील थोर विचारवंत, विद्वान, समाजसुधारक, अर्थशास्त्रज्ञ आणि आधुनिक भारताच्या निर्मीतीत ज्यांचा आदराने उल्लेख केला जातो असे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे होते. राजकीय जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील ते थोर तत्वज्ञ व मार्गदर्शक होते.

भारतीय जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी 1885 मध्ये मुंबई येथे काँग्रेसची स्थापना झाली या स्थापनेत रानडे यांचा पुढाकार होता. पहिल्या अधिवेशनाला जे 72 प्रतिनिधी उपस्थित होते त्यात रानडे हे प्रमुख होते.

सामाजिक सुधारणांचे पुरस्कर्ते असलेल्या रानडे यांनी काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनातच सामाजिक परिषदेची स्थापना करण्यात पुढाकार घेतला. नंतर 10 वर्षे काँग्रेसच्या अधिवेशनातच सामाजिक परिषदेचे अधिवेशन घेण्यात येत असे. आधी सामाजिक सुधारणा कि राजकीय सुधारणा हा वाद निर्माण झाल्यावर 1895 मध्ये पुण्यात भरणारे काँग्रेसचे अधिवेशन झाल्यास मंडप जाळण्याची काही सनातन्यांनी रानडे यांना धमकी दिली होती पण ते डगमगले नाही.

1890 मध्ये रानडे यांनी औद्योगिक परिषदेची स्थापना करून औद्योगिक विकासाला चालना दिली. खुला व्यापार व संरक्षित व्यापार यांचे विचार मांडून त्यांनी भारताला स्वतंत्र अर्थशास्त्र असावे असे स्पष्ट केले होते.

Vol. 5, Issue 5, May, 2019 | ISSN (Online): 2454-8499 | Impact Factor: 1.8167(GIF), 0.679(IIFS)

6) **फिरोजशहा मेहता -**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सनदशिर मार्गाने स्वातंत्र्य मिळवू इच्छिणाऱ्या गटातले प्रमुख म्हणून फिरोजशहा मेहता ओळखले जायचे. म्हणून राष्ट्रीय काँग्रेसच्या सुरुवातीच्या कालखंडातील आघाडीचे नेते अशी त्यांची ओळख होती. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत फिरोजशहा मेहता यांचा महत्वाचा वाटा होता. 1890 च्या कलकत्ता अधिवेशनाचे व 1909 च्या लाहोरच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. दादाभाई नौरोजी, बद्रुदिन तैय्यबजी, व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्याशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. 1905 ला इंग्रजांनी केलेल्या बंगालच्या फाळणीला त्यांचा विरोध होता. वृत्तपत्राद्वारे जनजागृती करण्यासाठी त्यांनी 1913 ला बॉम्बे क्रॉनिकल नावाचे वृत्तपत्र सुरु केले होते.

7) **विष्णुशास्त्री चिपळूणकर -**

सनदशीर मार्गाच्या द्वारे स्वातंत्र्य लवकर मिळणार नाही. उलट ज्या संस्कृतीसाठी भारत ओळखला जातो ती संस्कृतीच नष्ट होईल. अशी भीती व्यक्त करुन सनदशीर राजकारण कुचकामी आहे असा लोकांच्या मनात राजकीय विचारांचे वादळ निर्माण करणरा विचार विष्णुशास्त्री यांनी मांडला होता.

8) **लोकमान्य टिळक -**

ब्रिटिश सामाज्याच्या अन्यायी राजवटीने भारतीय जनता भरडली जात होती. लोकांचा स्वाभिमान खच्ची करुन त्यांना गुलाम करणे हाच ब्रिटिश सरकारचा उद्देश होता. लोकांचा स्वाभिमान जागृत करण्याकरीता अधिक व्यापक क्षेत्र हवे याच विचाराने 1881 मध्ये मराठा व केसरी वर्तमान पत्र सुरु करण्यात मोलाची भूमिका पार पाडली. जनतेमध्ये राजकीय प्रबोधन करणे व शासनावर दबाव निर्माण करणे हाच त्यांचा मूळ हेतू होता. टिळकांचा जसजसा राजकीय प्रभाव वाढत होता त्या प्रभावाने खवळलेल्या ब्रिटिश राजवटीने रॅंडचा खून, बंगालची फाळणी अशा प्रकरणामध्ये त्यांना अडकवण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचा परिणाम उलट झाला. त्यांचा राष्ट्रीय नेते म्हणून उदय झाला. सरकारबद्दलचा असंतोष साऱ्या देशभर पसरवण्यात टिळकांची भूमिका महत्वपूर्ण होती. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, असंतोष चळवळ या चतुःसूत्रीमुळे ब्रिटिश सत्तेला आव्हान निर्माण झाले. लाला लाजपतराय, बिपीनचंद्र यांनी देशभर ही चळवळ पसरविली. पुढे 1906 मध्ये कलकत्ता येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात स्वराज्य हे ध्येय निश्चित करण्यात जहालवादी यशस्वी झाले. 1914 रोजी मंडालेतून सुटून आल्यानंतर स्वराज्याच्या मागणीसाठी टिळकांनी झंझावाती प्रचार सुरु केला. याचाच भाग म्हणून 1916 मध्ये बेळगाव येथे होमरुल लिगची स्थापना करण्यात आली. ॲनिबेझंट व टिळकांनी या चळवळीच्या प्रचारासाठी ठिकठिकाणी सभा घेतल्या.

भारतात व भारताबाहेर या चळवळीच्या वाढत्या रेट्याने भारताला जबाबदार शासनपध्दती देण्याचा ब्रिटिशांचा मानस आहे अशी ऐतिहासिक घोषणा भारतमंत्री मॉन्टेग्यू यांनी 20 ऑगस्ट 1917 रोजी कॉमन्स सभागृहात केली. काँग्रेसनेही होमरुलचे उद्दिष्ट अधिकृतपणे स्वीकृत केले.

1919 साली अमृतसर येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात टिळकांनी प्रतियोगी सहकारितेचा मार्ग सांगितला. जे जे सरकारकडून मिळाले ते ते स्वीकारा आणि बाकीच्या हक्कांबाबत सनदशीर चळवळ चालू ठेवा अशी सूचना अमृतसर येथील अधिवेशनात टिळकांनी केली. सुधारणा कायद्यासंबंधी बोलताना टिळकांनी आपली भूमिका मांडताना प्रतियोगी शब्दाचा अर्थ सरकारशी निर्भेळ सहकार्य असा नव्हे, हे स्पष्ट केले. आवश्यक तेवढ्या विरोधाचा हक्क त्यात कायम रहातो हे त्यांनी स्पष्ट केले.

9) **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे -**

भारतात मॉटेग्यु चेम्सफर्ड सुधारणांमधून जातीचे राजकारण वाढत गेले. ब्राम्हणेत्तरांत व दलित समाजातही राष्ट्रीय वृत्ती निर्माण व्हावी यासाठी त्यांनी राष्ट्रीय मराठा संघ व अस्पृश्यता विरोधी समित्यांची 1917 साली स्थापना केली. 1917 च्या कलकत्ता येथील काँग्रेसच्या अधिवेशनात ॲनी बेझंट अध्यक्ष असताना त्यांनी अस्पृश्यता निवारणाचा ठराव मंजूर करून घेतला व अस्पृश्यांच्या समस्येला राष्ट्रीय महत्व प्राप्त झाले. 1918 मध्ये सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी मुंबईत पहिली भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद भरवली होती. शेतकरी, मजूर, अस्पृश्य अशा दुर्बल घटकांसाठी त्यांनी बहुजनपक्षाची स्थापना केली.

1928 मध्ये शेतक-यांची संघटना उभी करणा-यास जेथे बंधुंना त्यांनी मदत केली. तुकडेजोड विधेयकाने गरीब शेतकरी, भूमीहीन होण्याची शक्यता अधिक होती. यासाठी 1931 पासून शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रात अनेक ठिकाणी शेतकरी परिषदा भरविण्यात आल्या. या माध्यमातून त्यांनी या विधेयकाला विरोध केला. विधिमंडळावर त्यांनी मोर्चा नेला व सरकारला विधेयक रद्द करण्यास भाग पाडले.

10) **राजर्षी शाहू महाराज -**

लोकराजा ही बिरुदावली मिळालेल्या छत्रपती शाहू महाराजांचे जीवनकार्य म्हणजे एक वादळच होते. शाहूंच्या कालखंडात महाराष्ट्र म्हणजे सामाजिक अशांततेचे केंद्र बनले होते. अनेक नवीन सामाजिक चळवळी इथे सुरु झाल्या होत्या. शिक्षणप्रसार व अस्पृश्यता निवारण सुरु झाले होते. तरीही इथल्या राजकीय, सामाजिक व शैक्षणिक चळवळीचे नेतृत्व हे ब्राम्हण वर्गाच्याच हाती होते ते नेतृत्व बहुजन समाजाकडे खेचून आणण्यात शाहू महाराजांचा मोठा वाटा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज व भरपूर ऐश्वर्य असूनही विलासी जीवन न जगता हा राजा लोकांच्या कल्याणाकरिता झटला.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
Vol. 5, Issue 5, May, 2019 | ISSN (Online): 2454-8499 | Impact Factor: 1.8167(GIF), 0.679(IIFS)

शाहूंनी आपल्या संस्थानात शिक्षणप्रसार, अस्पृश्यता निवारण, व्यवसायाला प्रोत्साहन देऊन महाराष्ट्रातील दलित व मागासवर्गाची सामाजिक व मानसिक गुलामगिरीतून मुक्ता करण्याचा कसून प्रयत्न तर केलाच, पण त्याचबरोबर बहुजन समाजात राजकीय आकांक्षा जागृत करण्यात सुध्दा यश मिळवले. त्यामुळे शाहू च्याविरोधकांपेक्षा शाहू पखरे द्रष्टे ठरले.

शाहू हे उदार मानवतावादी, सामाजिक व राजकीय विचारवंत होते. शक्ती व सत्ता यांच्यापेक्षा प्रेमाने काम करण्यावर शाहू चाअधिक विश्वास होता.

11) **स्वातंत्र्यवीर सावरकर -**

माझ्या मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा सेतू उभरून मारता मारता मरेपर्यंत झुंजेन या प्रतिज्ञेसाठीच सावरकरांनी आपले आयुष्य वेचले. 1899 सालीच एक राष्ट्रभक्त समुह नावाची गुप्त संस्था स्थापन केली. या संस्थेत अनेक राजकीय वादविवाद चालत. सावरकरांच्या मित्रमेळ्याचे बिज याच संघटनेत आहे. या संघटनेला क्रांतिकारी गांधीलमाशांचे पोळे असे म्हटले जात असे. याच संघटनेचे रुपांतर पुढे 1904 साली अभिनव भारत या संघटनेत झाले. सशस्त्र क्रांतीने भारताचे राजकीय स्वातंत्र्य मिळवायचे हे या संघटनेचे ध्येय होते.

अभिनव भारताच्या प्रचाराचे काम करण्यासाठी त्यांनी विहारी या साप्ताहिकातून लिखाणास प्रारंभ केला आणि त्यालाच अभिनव भारताचे मुखपत्र बनवले. आपल्या जीवनक्रमाची माहिती सांगताना सावरकर म्हणतात, स्वायत्तता व स्वातंत्र्य हाच राष्ट्राचा प्राण आहे. त्याच्यावरच राष्ट्राच्या नाडीचे ठोके पडत असतात. अशी माझाठी दृढ भावना आहे. माझ्या बालपणपासून ते तारुण्याच्या या क्षणापर्यंत माझ्या देशाच्या स्वातंत्र्याची हानी आणि ते स्वातंत्र्य परत मिळण्याची शक्यता या एकाच विषयाची मला रात्री स्वप्ने पडतात. अन् या एकाच विषयाचा ध्यास मला दिवसा लागून राहिलेला आहे.

12) **डॉ.बाबासाहेब आंबेडकर -**

राजकीय सुधारण घडवून आणण्यासाठी 1927 साली सायमन कमिशनची जेव्हा स्थापना करण्यात आली तेव्हा बहिष्कृत हितकारणी सभेच्या वतीने आंबेडकरांनी सायमन कमिशनसमोर काही राजकीय मागण्या ठेवल्या.

1. दलित वर्गासाठी मुंबई विधिमंडळात 140 पैकी 22 जागा असाव्यात.
2. कायदेमंडळाच्या अध्यक्षाला व मंत्रीमंडळाला बडतर्फ करण्याचा अधिकार कायदेमंडळाला असावा.
3. मुंबई प्रांतातून सिंध व कर्नाटक वेगळे करू नये.

सायमन कमिशननंतर भारत सरकारने भारताला द्यावयाच्या स्वातंत्र्याचा आराखडा निश्चित करण्यासाठी 1930 मध्ये लंडन येथे गोलमेज परिषद घेण्याचे ठरविले. 12 नोव्हेंबर 1930 रोजी सुरु झालेल्या गोलमेज परिषदेमध्ये आंबेडकरांनी अस्पृश्यांनाही स्वतंत्र मतदार संघ देण्याची मागणी केली.

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
Vol. 5, Issue 5, May, 2019 | ISSN (Online): 2454-8499 | Impact Factor: 1.8167(GIF), 0.679(IIFS)

दुस-या गोलमेज परिषदेत गांधींनी जातीनिहाय विशेष प्रतिनिधीत्व देण्यास विरोध केला. डॉ. आंबेडकरांनी या प्रस्तावाला विरोध केला.

24 सप्टेंबर 1932 रोजी आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात पुणे करार घडून आला. आंबेडकरांना राजकीय हित यात साध्य करण्यात काही प्रमाणात का असेना यश मिळाले. अस्पृश्यासाठी 148 जागा राखीव ठेवण्यात, संसदेतील दोन्ही सभागृहात 18 टक्के प्रतिनिधीत्व असावे, अस्पृश्याच्या विकासासाठी अंदाज पत्रकात तरतुद करण्यात यावी इ.

1935 च्या कायद्याने प्रांतांना स्वायत्तता मिळू लागल्याने होऊ घातलेल्या निवडणुकीत आंबेडकरांनी उतरण्याचा निर्णय घेतला. ऑगस्ट 1936 मध्ये त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. 17 फेब्रुवारी 1937 रोजी झालेल्या निवडणुकीत स्वतंत्र मजूर पक्षाला दवदवीत यश लाभले त्यांचे 17 पैकी 13 उमेदवार निवडून आले. थॉटस ऑन पाकिस्तान हा आंबेडकरांचा ग्रंथ 1940 साली प्रकाशित झाला. मुसलमान हे वेगळे राष्ट्र आहे हे मान्य करतांना पाकिस्तानच्या निर्मितीने भारताच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण होईल या आक्षेपाचे त्यांनी खंडन केले होते.

1942 ते 1946 या काळात मजूर मंत्री असतांना आंबेडकरांच्या प्रयत्नाने सरकार, मालक, कामगार, संघटना यांचे त्रिसदस्यीय मंडळ स्थापन करुन त्यांच्यात समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची निवड घटना समितीचे सल्लागार म्हणून करण्यात आली. 1946 मध्ये आंबेडकर यांनी घटनेचा मसुदा घटना समितीला सादर केला त्यात समाजवादाचा पुरस्कार करतांना विमा, मुलभूत उद्योग, शेती यांचे राष्ट्रीयकरण करण्याची शिफारस आंबेडकरांनी केली. व्यक्ती स्वातंत्र्याचाही त्यांनी पुरस्कार केला. हे बाबासाहेबांचे राजकीय कार्यातील सर्वोच्च यश होते. त्यांचा सन्मान करण्यासाठी पंडित नेहरुंनी आपल्या हंगामी मंत्रिमंडळात आंबेडकरांना विधिमंत्री म्हणून नियुक्त केले. घटना मसुदा समिती अध्यक्ष म्हणून पुढे बाबासाहेबांनी काम पाहिले. सहा महिने अखंड झटून एकहाती तयार केलेला घटनेचा कच्चा मसुदा समितीसमोर ठेवला. भारतामध्ये संसदीय शासन पध्दतीची तरतुद आंबेडकरांनी केली. एक विधायक राजकीय व्यवस्था प्रतिष्ठापीत करण्यात बाबासाहेबांचे योगदान होते असे म्हणायला हरकत नाही. पुढे हिंदुकोडबील, विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, दत्तक विधान, अशा विविध घटनात्मक कायद्यांना चालना देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. मात्र कॉंग्रेसी मंत्रीमंडळात आपल्याला फार काही हाती लागणर नाही म्हणून मंत्रीमंडळातून बाहेर पडून वेगळी राजकीय संघटनेची मोट बांधण्याचा भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचा अंतर्मनात विचार त्यांनी सुरु केला होता. आपले कार्य विशिष्ट जाती, वर्ग, धर्मापुरताच मर्यादीत न रहाता अखिल भारताचे राजकीय नेतृत्व आपण करावे असे स्वप्न पहात असतांनाच त्यांचे महानिर्वाण झाले. अन्यथा आज भारताचे राजकीय विकासाचे चित्र वेगळे राहिले असते.

**निष्कर्ष :-**

महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय अशा दोन्ही पातळ्यांवर कार्य करणारे विचारवंत, त्यांच्या कार्याचा शोध घेतल्यानंतर जाणवले की, त्यांनी महाराष्ट्राचाच नव्हे तर भारतातील राजकीय क्रांतिला, राजकीय परिवर्तनाला व विकासाला चालना दिलेली आहे.

ब्रिटिश शासनाची मर्जी राखून अथवा सनदशीर मार्गाने विरोध करुन, क्रांतिच्या मार्गाचा अवलंब करुन स्वातंत्र्याचे ध्येय गाठण्याचा प्रयत्न केला व स्वतःचे शासन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. तत्कालीन परिस्थितीत त्यांनी अनुसरलेला जोही मार्ग होता तो समर्थनीय होता. जगन्नाथ शंकरशेठ त्यांनी बॉम्बे असोसिएशनची स्थापना करुन महाराष्ट्रात लोकशही राज्याचे बिजारोपण केले. लोकहितवादींनी त्यापुढे एक पाऊल पुढे टाकून म्हटले हिंदुस्थानचे स्वतंत्र पार्लमेनट असावे. ज्योतिराव फले यांनी हिंदुस्थानात राजकीय चळवळ उभी करणा-या राष्ट्रीय पक्षाला सर्व धर्मियाची बनावी असा सल्ला दिला. सार्वजनिक काकांनी ब्रिटीश पार्लमेन्ट मध्ये भारतीयांना प्रतिनिधित्व मिळावी अशी मागणी लावून धरली. न्या. महादेव गोविंद रानडे यांनी राजकीय जीवनाच्या सर्वच क्षेत्रात मार्गदर्शन केले. फिरोजशहा मेहतांनी बॉम्बे क्रॉनिकल नावाचे वृत्तपत्र सुरु करुन जनतेचे राजकिय प्रबोधन करण्यावर भर दिला. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी सनदशिर मार्गाचा त्याग करुन राजकीय विचारांचे वादळ निर्माण केले. लोकमान्य टिळकांनी सामाजिक सुधारणेपेक्षा राजकीय सुधारणेवर भर दिला. विठ्ठल रामजी शिंदे यांनी बहुजन समाजासाठी बहुजन पक्षाची स्थापना झाली पाहिजे असा आग्रह धरला. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राजकारणात उदारमतवाद आणुन धर्म व जातीच्या पलिकडे जाऊन राजकीय कार्य केले. सावरकरांनी साम, दाम, दंड, भेद या मार्गाचा अवलंब करून घटनावाद प्रस्थापित झालाच पाहिजे असा आग्रह धरला तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेचाच आधार घेऊन भारतात लोकशाही समाजवादी, गणराज शासन पध्दती प्रस्थापित करून राजकीय मंदीरावर सोन्याचा कळस ठेवला.

**संदर्भ -**

1. अ.भ.धर्माधिकारी - महाराष्ट्रातील समाजसुधारक - चाणक्य मंडळ परिवार
2. भास्कर लक्ष्मण भोळे - भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स नागपूर
3. प्राचार्य डॉ.पी.डी.देवरे, डॉ.डी.एस.निकुंभ - भारतीय राजकीय विचार, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
4. डॉ.वा.भा.पाटील - आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
5. डॉ.वा.भा.पाटील - प्राचिन व आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
6. डॉ.जयसिंगराव पवार - राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर